# प्रकरण - १

## उदर संज्ञा - निर्णय

उदर शब्द धात्वर्थ व पर्याय शब्द -- उदरम - क्री [ उत अणातीति । उदिदृणातेरजलौ पूर्वपदान्त्यलोपश्च । उत् + दृ + अच् । अन्त्य लोपश्च । नाभिस्तनयो: मध्यभाग: । पेट इति भाषा ... क्षीर-स्वामी टीका.

उदर -- पर्याय शब्द - [1] उदर या शब्दाचे पर्याय अमरकोशांत खालीलप्रमाणे वर्णन केलेले आहेत. १. पिचिण्ड, २. कुक्षी, ३. जठर, ४. तुन्दम्. ५. उदर उदर: [पु.] उदरम अन्यत्वेनास्त्यस्य । अर्श आदित्वाच्च । उदरस्थ रोगविशेषश्च....। उदरी इति भाषा... यथा... अथोदराधिकार : । उपस्थमुदरम् जिव्हा हस्तौ पादौ च पंचमम् । ... इति मनु: । याप्रमाणे मनूनें उदराचा उल्लेख केलेला आहे.

विकार नामाभिधानार्थ आयुर्वेदीय हेतु - आयुर्वेदामध्यें विकारांची नांवे [ संज्ञा ] देतांना बहुविध दृष्टिकोनातून विचार केलेला दिसून येतो.

१] संप्राप्तीतील प्रमुख दोषदूष्यांची विकृति लक्षात घेऊन कांही वेळां व्याधींचीं नांवे दृढ होतात. उदा. वातरक्त, आम्लपित्त, आमवात, रक्तपित्त.

२] रोगाचे स्वरूप लक्षात घेऊन काही वेळां व्याधींना नांवे दिली जातात. उदा. कुष्ठ, विसर्प, गुल्म, शोथ, विद्रधि.

---

१. पिचिण्डकुक्षीजठरोदरतुन्दम् । अमरकोश

३]        व्याध्युत्पत्ति हेतुवरून व्याधींची नांवे दिली जातात. उदा. कलायखंज, उपदंश, कृमी, फिरंग, मृज्जन्य पाण्डू, गर्भिणी, छर्दि.

४]        व्याधिसंप्राप्तीनें उत्पन्न होणाऱ्या लक्षणसमुच्चयापैकीं एकादे महत्वाचें लक्षणावरून व्याधींचे नांवे ठरिवीतात. उदा. ज्वर, कास, छर्दि, हिक्का, शूल.

५]        वर्णभेदानें नामाभिधान केले जाते. उदा. पाण्डू,[श्वेत] कामला,[पीत] हलीमक [हरित ]

६]        दूषित दोषदूष्यांनीं एकाधा शारीर अवयावाला दूषित करुन विकार निर्माण केल्यास त्या स्थानावरुन विकाराला नांव पडतें. उदा.

तत्स्थानात तद्धर्मताभ्यां च तत्समीपतया पि च ।
तत्साहचर्याच्छब्दानां वृत्तिरेषा चुतुर्विधा ।। शार्ङ्गधर

तत्स्थानात -- उदा. हृदयांत हृद्रोग.
ग्रहणींत ग्रहणी
यकृत प्लीहेंत -- यकृत प्लीहा
उदरांत उदर.

हृदयांत होणारा हृद्रोग ग्रहणी स्थान दुषित होऊन ग्रहणी तदवतच उदरांत दोषदूष्टी होऊन निर्माण होणारा विकार " उदर " संज्ञेने उल्लेखिला आहे. उदराची संप्राप्ति वर्णितांना... रुद्ध्वा स्वेदांबुवाहिनि जनयन्त्युदरं नृणाम् । असा उल्लेख आहे.

---

१.        एवं प्रकुपिता तान् तान् शारीरपदेशानागम्य तांस्तान् व्याधिन् जनयन्ति । ते यदोदरसन्निवेशं कुर्वन्ति तदा गुल्म ~~विद्र~~ विद्रध्युदराग्निसंगानाहविषूचिकातिसार प्रभूतीन् जनयन्ति । सु.सू.२१/३३.

..११

उदराची सामान्य लक्षणे -- आध्मानं गमने शक्ति...
दाहस्तन्द्रा च सर्वेषु जठरेषु भवन्ति हि । उदराला जठर हा पर्याय
शब्द योजला आहे. उदर रोग झालेला त्या म्हणून उदरी. उदराची
असाध्य लक्षणे सांगतांना " श्वयथुः सर्वमर्मोत्थ श्वासो हिक्का...
अतिसारः निहन्त्युदरिणं नरम् । असा उल्लेख आढळतो.

उदरामयः[पु.] उदरस्य रोगविशेषः । हा पर्याय
अतिसाराचा आहे. ... त्रिकाण्डशेष.

अस्य उपशमलक्षणं चिकित्सास्थाने नवमाध्याये वाग्भटेन
उक्तम ।

यस्योच्चाराद्विना मूत्रं पवनो वा प्रवर्तते ।
दीप्ताग्नेर्लघुकोष्ठस्य शान्तस्तस्योदरामयः ।

उदरावर्त -- [पु. ] उदरे आवर्त इव ] नाभिः ... राजनिर्घण्ट
उदरिणी --[स्त्री ] तज्जातगर्भोर्ी स्या अस्तीती

उदर ई- इति -- डीम -- गर्भवती -- इति हेमचन्द्र : ।
उदरं अस्या अस्ति इति वाक्य बृहदुदरयुक्ता ।
लम्बस्तनीमुदरिणीं विदीर्णोत्फुल्लपादकाम् ।
धात्रा वैरूप्यनिर्माणवैदग्ध्यीं दर्शितामिव ।

[ कथासरित्सागरे विशतिमे रंगे ]

उदरिलः त्रि [ अतिशयितं उदरस्य उदर ।--तुन्दादिभ्यः ] [ इलच्चेति
इच इलच् ] बृहदुदरयुक्तः मुंडिया इति भाषा । तत्पर्यायः १] पिचिण्डलः
२] बृहत्कुक्षिः ३, तुन्दि, ४] तुन्दिकः ५] तुन्दिलः, ६] उदरी हेमचंद्रः
उदरी [ब.] त्रि. अतिशयितं उदरं अस्य । उद इति ] उदरिलः हेमचंद्रः
उदर रोगग्रस्तः । यथा सुश्रुते [चि.अ. १४]

..१२

उदरी तु गुर्वभिष्यन्दिरूक्षविदाहि स्निग्धपिशितपरिषेका-
वगाहान् परिहरेत । शालिषष्टिकयवगोधूमनीवारान्नित्यमश्नीयात् ।

वरीलप्रमाणें उदर शब्द संस्कृत वाङमयांत व आयुर्वेदात भिन्न भिन्न स्थळीं उद्धृत केलेला आहे.

" उदरविकार " ह्या नांवानें कांहीं विशिष्ट संप्राप्तीनें होणारा विकार, ज्यांत उदर मोठें होतें त्याला उदर असें नांव आहे.

उदर रोगाची संख्यात्मक संप्राप्ति सांगतांना [ अष्टौदराणि ] स्थानविशेषानें व अवस्थाविशेषानें उदराला भिन्न भिन्न संज्ञा दिलेल्या आहेत. उदरवृद्धि होऊन ते ज्याचे प्रत्यात्मलिंग आहे अशा विकाराला वात, पित्त कफ या दोषांच्या दुष्टीमुळे क्रमानें वातोदर, पित्तोदर, कफोदर, अशा संज्ञा प्राप्त होतात. तीन दोषांच्या दुष्टीनें सान्निपातिक [ दूष्योदर ] प्लीहावृद्धि हे ज्या उदराचे कारण आहे, असें प्लीहोदर तसेंच यकृद्दाल्युदर अर्श, शकृत, वगैरेंच्यामुळे अवरोध होऊन निर्माण होणारे बद्धगुदोदर, शर्करा, अस्थि, कंटक, वगैरेंनी अंत्रभेद, होऊन होणें तें क्षतोदर [ परिस्रावी उदर ] वातादि सप्त उदरांचे अखेर जलांत पर्यवसान झाल्यानें किंवा अत्यंबुपानामुळे होणारे जलोदर वगैरेंना त्या त्या संज्ञा प्राप्त होतात.

## ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उदर विवेचन

ज्योतिष शास्त्र दृष्टया जन्मस्थ कुंडलीच्याग्रहावरून सुद्धां रोगविनिश्चय करतां येतो.

व्ययेशे रोगराशिस्थे दोशो व्ययराशिगे ।
त्रिशांद्वर्षकोन वर्षे उदरोगं विनिर्दिशेत् । हस्तलिखित
जयपूर पॅलेस लायब्ररी




उदर. सिंहलग्न असतां व्दादश स्थानाचा स्वामी चंद्र होतो व रोग-स्थानचा स्वामी शनि होतो. ह्या कुंडलीत चंद्र षष्ठस्थानी [ रोगस्थानी ] व शनि व्दादशस्थानीं असतां उदररोग संभवतो.

चंद्र या ग्रहाचा शरीरस्थ अवयांवावर असणारा अंमल खालीलप्रमाणें आहे. उदर, उर, मन... यामुळें उदर [ जलोदर ] हा विकार निर्माण होतो. चंद्र ग्रह शीतल , शांत, अब्धातु प्रधान आहे व जलोदरही -- " रुध्वा स्वेदांबुवाहीनि " म्हणजे उदकवह स्त्रोतोदुष्टीनें निर्माण होणारा विकार आहे. त्यामुळें चंद्र व उदर रोग यांचा परस्पर संबंध ज्योतिषांत वर्णिलेला आहे.

आत्तापर्यंत आपण उदर शब्द धात्वर्थ, उदराचे पर्याय शब्द, तसेच आयुर्वेदातील विकारांचीं नांवें [ संज्ञा ] देतांना बहुविध दृष्टिकोनांतून केलेला विचार मांडला आहे. शरीरांतील विशिष्ट स्थानदुष्टीवरुन रोगाला विशेष संज्ञा प्राप्त होते. या नियमाला अनुसरुन उदरस्थानांत उत्पन्न होणाऱ्या विकाराला " उदर " नांवानें संबोधिलें आहे. उदर शब्द संस्कृत वाङ्मयांत व आयुर्वेद शास्त्रांत भिन्न भिन्न स्थळीं आलेला आहे. स्थानानुरुप व अवस्थानुरुप उदरांना वातोदर, जलोदर, वगैरे संज्ञा प्राप्त झाल्या आहेत. चंद्र व उदर रोग यांच्या साहचर्यावरुन ज्योतिष व वैद्यक यांचा किती निकटचा संबंध आहे हे दिसून येते.

-x-x-x-x-x-x-